1) पूण्यनगरी पु. पान क्र. 2

दि. 09/01/2023

# ५८२ जणांना शोधण्यात पोलिसांना यश

।मीरा रोड। मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय सखोल तपास आणि न्यायालयात दोषारोपपत्र सादर केल्यानंतर आरोपींना दोषी ठरवण्यात पुढे आहे. याच कामासाठी आयुक्तालयाचा गुन्हे दोषसिद्धी करण्यात महाराष्ट्रात ८९.६३ टक्के गुण प्राप्त करत प्रथम क्रमांक आला आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत कलम ३६३ प्रमाणे १८ वर्षांच्या आतील ६५० मुले, मुली हरवल्याचे गुन्हे दाखल होते. त्यापैकी (१९६) मुली व (४५४) मुलांचा समावेश होता. यापैकी एकूण ५८२ जणांना शोधण्यास मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिसांना यश मिळाले आहे. प्रलंबित ६८ जणांचा पोलीस तपास करत आहेत.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना १ ऑक्टोबर २०२० मध्ये करण्यात आली आहे. त्या वेळी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त म्हणून सदानंद दाते यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नियुक्तीनंतर आयुक्तालय कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे काम त्यांनी केले आहे. महाराष्ट्रात गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ होत आहे. ही वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस कारवाई करण्यात आघाडीवर आहेत.

दाते यांनी सूत्रे सांभाळताना गुन्हेगारी रोखण्यासाठी भर दिला होता. अधिकारी, कर्मचाऱ्यांना कामासाठी वेगळे प्रोत्साहन दिले. दोन वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर आता त्यांची बदली झाली आहे. त्यांच्या जागी पोलीस आयुक्तपदी मधुकर पांडे यांची नियुक्ती झाली आहे. पांडे यांनी शहरातील गुन्हेगारी संपवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

2) म. टा. पु. पान क्र. 1

# क्रीडासंकुलासाठी आंदोलन

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर



मिरा-भाईंदरमधील एकमेव क्रीडासंकुल मागील दोन महिन्यांपासून बंद आहे. हे क्रीडासंकुल कोणतीही पूर्वसूचना न देता बंद करण्यात आले आहे. परिणामी, खेळाडूंना शुल्क अदा केल्यानंतरही सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याने गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, क्रीडासंकुल तात्काळ खुले करण्याच्या मागणीसाठी काँग्रेसतर्फे आंदोलन करण्यात आले.

मिरा-भाईंदर पालिका हद्दीतील खेळाडूंना सरावासाठी मुंबई व इतर शहरांत जाण्याची गरज भासू नये, तसेच एकाच छताखाली सर्व सुविधा उपलब्ध असाव्यात, या दृष्टीने पालिका प्रशासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून भाईंदर पूर्वेला इंद्रलोक परिसरात भव्य क्रीडासंकुल उभारले आहे. येथे तरणतलाव, स्केटिंग, व्यायामशाळा, बास्केटबॉल, लॉन टेनिस, स्नूकर, बॅडमिंटन व बॉक्सिंग इत्यादी खेळ खेळण्याची सुविधा आहे.

पालिकेने हे संकुल कंत्राटी पद्धतीने चालवण्यासाठी दिले होते. मात्र कंत्राटाची मुदत संपुष्टात आल्याने, हे क्रीडासंकुल पूर्वसूचना न देताच नोव्हेंबर महिन्यात बंद करण्यात आले आहे. क्रीडा सुविधा पुरवण्यासाठीचे शुल्क कंत्राटदाराने खेळाडूंकडून आधीच घेतले आहे. त्यानंतरही मागच्या तब्बल दोन महिन्यांपासून हे संकुल बंद असल्याने खेळाडूंनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या मुद्द्यावर समाजमाध्यमांवर अनेकांनी संताप व्यक्त केला आहे.

क्रीडासंकुल चालवण्याच्या कंत्राटाची मुदत संपुष्टात येण्यापूर्वीच पालिका प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने त्याच्या निषेधार्थ काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी संकुलाबाहेरच विविध खेळ खेळून आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करत, तात्काळ क्रीडासंकुल सुरू करण्याची मागणी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली.

CamScanner

3) पुढारी पु: पान क्र. 2

दि. 09/01/2023

# वीजबिलाच्या नावाखाली महिलेची ऑनलाईन लूट

## फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून देण्यात पोलिसांना यश

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

वीजबिलाच्या नावाने ऑनलाईन फसवणूक झालेली रक्कम महिलेला परत मिळवून देण्यात नालासोपारा पोलिसांना यश आले आहे. तांत्रिक माहितीच्या आधारे तपास करून सदर रक्कम महिलेच्या बँक खात्यात पुन्हा जमा करण्यात आली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीतील नालासोपारा पश्चिमेच्या यशवंत गौरवमधील ऍप्पल २ मध्ये राहणाऱ्या प्रियंका बिल्कु चक्रवर्ती यांना मोबाईलवर एक अनोळखी व्यक्तीने संपर्क साधून आपण एमएसईबीमधून बोलत असल्याचे भासवून तुमच्या घराचे वीजबिल भरणे बाकी आहे. ते न भरल्यास वीजपुरवठा खंडित होईल. त्यामुळे वीजपुरवठा अखंडित सुरू ठेवायचा असल्यास तत्काळ ऑनलाईन बिल भरा, असे सांगून त्यांनी प्रियंका यांना एक लिंक पाठविली. सदर लिंक प्रियंका यांनी ओपन केली असता त्यावर एनी डेस्क या ॲप्लिकेशनद्वारे एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्या बँक खात्यातून परस्पर तीन व्यवहार करून एकूण रक्कम २५ हजार रुपये डेबिट केले. त्याचा मेसेज प्रियंका यांना प्राप्त झाल्याने त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी तत्काळ नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रारअर्ज दिला.

पोलिसांनी त्याची दखल घेत झालेल्या व्यवहाराची माहिती घेतली असता प्रियंका यांची फसवणूक झालेली रक्कम ऐरॉन पे, वनमोबिक्विक व पेयु पेमेंट या ऑनलाईन पेमेंट गेटचे वर गेल्याचे समोर आले.

पोलिसांनी त्या-त्या पेमेंट गेटवेच्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून प्रियंका यांची डेबिट झालेली रक्कम तत्काळ फ्रीज करण्याबाबत ई-मेलद्वारे पत्रव्यवहार केला. त्यानुसार, पेयू पेमेंट नोडल अधिकारी यांनी प्रियंका यांची फसवणूक झालेल्या रकमेची पडताळणी करून पेयू पेमेंट गेटवेवर असलेल्या २५ हजार रुपयांचा व्यवहार होल्ड केल्याचे पोलिसांना कळविले. यानंतर ही रक्कम प्रियंका यांच्या खात्यावर वळविण्यात आली. अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी लोकांनी फसवे कॉल अथवा एसएमएस प्राप्त झाल्यास त्याला कोणताही प्रतिसाद देऊ नये. तसेच मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारे एसएमएस, ई-मेल, कॉल्स यांची विश्वासार्हता पडताळावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### फसवणूक टाळण्यासाठी उपाय

मोबाईलवर प्राप्त होणारा ओटीपी किंवा वैयक्तिक माहिती कोणालाही देऊ नये. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्वरित लगतच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, जेणेकरून त्या कमी वेळेत फसवणूक झालेली रक्कम परत मिळविण्याकरिता मदत होते. अशा प्रकारे फसवणूक करणे कायद्याने गुन्हा असून असा प्रकार कोणी करीत असल्याचे आढळून आल्यास तत्काळ जवळचे पोलीस ठाणे अथवा सायबर गुन्हे कक्षाला १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी, असे आवाहन उपायुक्त सुहास बावचे यांनी केले आहे.

4) पुढारी पु: पान क्र. 2

# मिरा-भाईंदरमध्ये महिलांच्या तक्रारींच्या निवारणासाठी 'पुन:धैर्य'

## पोलीस आयुक्तालयांकडून योजना राबविण्यात येणार

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत असलेल्या पोलीस ठाण्यांमध्ये महिलांच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने योग्य कार्यवाही होण्याच्या दृष्टिकोनातून पुन:धैर्य योजना राबविण्यात येणार आहे.

पोलीस ठाण्यांमध्ये महिलांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या चौकशीच्या अनुषंगाने तक्रारदार व गैरअर्जदार यांना पोलीस ठाण्यात समक्ष बोलवून कायदेशीर कार्यवाही करण्यात येते किंवा काही प्रकरणांमध्ये महिला तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये समेट किंवा तडजोड होऊन सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येते. काही प्रकरणांमध्ये प्राप्त तक्रारी निकाली काढल्यानंतर काही दिवसांनंतर तक्रारदार महिलांना गैरअर्जदारांकडून पुन्हा त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या आदेशानुसार पुन:धैर्य योजना राबविण्यात येणार आहे.

सध्या कुठल्याही प्रकारचा त्रास अथवा छळवणूक होत असल्यास त्याबाबत विचारणा करण्यात येणार आहे. त्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार असून हा उपक्रम दर शनिवारी राबविण्यात येणार आहे. महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यामार्फत तक्रारी हाताळण्यात येणार आहे.

ही योजना विभागीय सहायक पोलीस आयुक्त यांच्या पर्यवेक्षण व परिमंडळीय पोलीस उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार असून पोलीस आयुक्त या योजनेचा आढावा घेणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र, या योजनेचा गैरफायदा घेऊन काही महिला पुरुषांची बदनामी करीत असल्याने महिलांकडून दाखल होणाऱ्या तक्रारी कितपत खऱ्या आहेत, त्याची शहानिशादेखील पोलिसांकडून करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

CamScanner

5) म.टा. पान क्र. 1

दि. 09/01/2023

# हरवलेल्या मुलांना आता 'आधार'!

**Sharmila.kalgutkar**
@timesgroup.com
@KsharmilaMT

**मुंबई :** घरातून पळून गेलेल्या तसेच हरवलेल्या शेकडो मुलांच्या पालकांचा शोध आता 'आधार'मुळे सोपा होणार आहे. या मुलांच्या पालकांचा ठावठिकाणा शोधणाऱ्या संस्थांना पालकांची माहिती



### बोटांचे ठसे आणि ठावठिकाणा

पालकांना शोधण्यासाठी बालसुधारगृहातील काही मुलांच्या बोटांचे ठसे घेण्यात येतात. हे ठसे आधार कार्डच्या यंत्रावर उमटवल्यानंतर त्यांचाही कार्ड क्रमांक मिळतो. पत्ताही स्पष्ट होतो. मात्र मुले इतर राज्यातील असतील तर त्यांचा ठावठिकाणा लगेच मिळत नाही. ज्यांचे पालक मुले हरवल्याची तक्रार नोंदवताना आधारक्रमाकांचीही माहिती देतात, त्या मुलांचा शोध घेणे यंत्रणेला सोपे होते.

## पालकांचा शोध घेणे तुलनेने होणार सोपे

मिळावी यासाठी सातत्याने यंत्रणेकडे खेपा घालाव्या लागत होत्या. आता ही दगदग थांबणार असून या मुलांची आधार नोंदणी केली जाणार आहे. जर या मुलांची आधार नोंदणी यापूर्वीच त्यांच्या पालकांनी केलेली असेल तर ही मुले कोणत्या राज्यातील आहेत याची माहिती 'युनिक आयडेंटिफिकेशन ॲथॉरिटी'च्या माध्यमातून शोधता येणार आहे. त्यामुळे हरवलेल्या मुलांच्या पालकांचा शोध घेणे तुलनेने सोपे होणार आहे.

देशाच्या कानाकोपऱ्यातून या शहरामध्ये प्रत्येक वर्षी शेकडो मुले पळून येतात वा आणली जातात. करोना काळामध्ये या मुलांची नोंदही झाली नाही. हरवलेल्या, वाट चुकलेल्या या मुलांना पोलिसांमार्फत, तर कधी समाजातील (पान ८वर)

# हरवलेल्या मुलांना आता 'आधार'!

(पान एकवरून) संवेदनशील व्यक्तींच्या माध्यमातून संस्थांमध्ये आणले जाते.

मूकबधीर, लहान मुलांना त्यांचा नेमका पत्ता तसेच ठावठिकाणा सांगता येत नाही. ती कुठून आली याची माहिती नसते. दडपण, अस्वस्थता तसेच भेदरल्यामुळे ही मुले स्वतःची पूर्ण माहिती देत नाहीत. या मुलांचा सांभाळ करणाऱ्या संस्था त्यांच्या पालकांचा शोध सातत्याने घेत असतात. आधार कार्ड हा महत्त्वाचा दुवा असला तरीही या मुलांसंदर्भातील माहिती तत्काळ मिळत नाही. आता मात्र सरकारने यासंदर्भात गांभीर्याने विचार करून या मुलांचा सांभाळ करणाऱ्या, या मुलांना पुन्हा पालकांकडे पाठवण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या संस्थांना सहकार्याचा हात दिला आहे.

सरकारने दिलेल्या निर्देशामुळे नोंदणीकृत मुलांची माहिती संस्थांना मिळेल. पालकांनी ज्या मुलांची नोंद केलेली आहे त्यांची नव्याने नोंद झाल्यास डुप्लिकेट असा उल्लेख येईल. त्यावेळी पालकांचा शोध घेणाऱ्या संस्थांना आधार यंत्रणेशी संपर्क साधून या मुलांच्या पालकांचा पत्ता घेणे आता शक्य होणार आहे. यूआयडीएआयच्या माध्यमातून या मुलांची बायोमेट्रिक माहिती तसेच बोटांचे ठसे ही माहिती पडताळून पाहता येईल. ही माहिती बालसंरक्षण समितीकडे देण्यात येईल. पोस्ट ऑफिस, बँक, आधार सेवा केंद्र तसेच आधार सुविधा केंद्रांची उपलब्धता असलेल्या सरकारच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये या केंद्रांची यादी लावता येणार आहे. वात्सल्य पोर्टलशी ही यादी जोडण्यात येईल. ज्या पालकांनी या मुलांची नोंद 'आधार'मध्ये केलेली असते त्यांची माहिती संस्थांना यंत्रणेकडून गोपनीयतेच्या कारणामुळे दिली जात नव्हती. आता ती अडचण राहणार नाही.

'बालाआशा' संस्थेचे संचालक सुनील अरोरा यांनी बिहारमधून हरवलेल्या दोन बहिणींचा अनुभव सांगितला. मूकबधीर असलेल्या मोठ्या मुलीला कोणतीही माहिती देता येत नव्हती. त्या दिवशीही ही मुलगी रेल्वेमध्ये गेली, मात्र मूकबधीर असल्याने गाडी सुटल्याचा आवाज तिला ऐकू आला नाही. बिहारहून ती थेट मुंबईला आली. आधारच्या माध्यमातून तिला पालकांसोबत पुन्हा जोडून देणे शक्य झाल्याचे अरोरा यांनी सांगितले.

CamScanner

दि. 09/01/2023

6) लोकमत पान क्र. 12

## दोन सख्ख्या बहिणींचे अपहरण



लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसईत दोन सख्ख्या बहिणींचे अपहरण करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. वसईच्या रामदास नगर परिसरात राहणाऱ्या अकरा व आठ वर्षांच्या दोन्ही बहिणी २ जानेवारीला सकाळी घराबाहेर गेल्या, त्या नंतर घरी न परतल्याने त्यांचा सर्वत्र शोध घेण्यात आला.

मात्र, त्या सापडल्या नाहीत. त्यांचे आरोपीने अपहरण केल्याचा संशय आल्याने मुलीच्या आईने पाच दिवसांनंतर शनिवारी माणिकपूर पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

7) पुण्यनगरी पु. पान क्र. 1

## डोंगर चढताना धाप लागून तरुणाचा मृत्यू

। नालासोपारा : विरार पूर्वकडील जीवदानी देवीदर्शनासाठी पायी डोंगर चढणाऱ्या १९ वर्षीय मुलाचा धाप लागल्याने दुर्दैवी मृत्यू झाला आहे. याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मुंबईतील नायगाव-दादर येथे राहणारा सोनू जयस्वाल मोठ्या भावासोबत शुक्रवारी विरारमधील जीवदानी देवीच्या दर्शनासाठी आला होता. दुपारी दोनच्या सुमारास पायरी मार्गावरून डोंगर चढत असताना त्याला दम लागला. नंतर चक्कर येऊन जागीच बेशुद्ध पडला. त्याला त्वरित संजीवनी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. विरार पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

8) पुण्यनगरी पु. पान क्र. 1

## मारहाण करणाऱ्या तिघांना अटक

। मीरा रोड : नवघर पोलीस ठाणे हद्दीत गाडीच्या मिररचा धक्का लागल्याच्या बहाण्याने सुरू असलेल्या वादात तीन अनोळखी व्यक्तींनी गाडी मालकाला मारहाण करत त्याच्या जवळील मोबाइल, चेन, रोख रक्कम असा ४ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी करून पळ काढल्याची घटना शुक्रवारी रात्री फाटक रोड येथे घडली होती. याबाबत गाडी मालक प्रदीपसिंह गोहिल यांनी तीन जणांविरोधात नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रार दाखल होताच नवघर पोलिसांनी त्यांचा शोध घेत काही तासांत तिघांना अटक केली. त्यांच्याकडून अद्याप मुद्देमाल हस्तगत करण्यात आला नाही.

CamScanner

लोकमत

# आठ वर्षांच्या मुलाचे अपहरण

**नालासोपारा :** नालासोपारा येथील आठ वर्षीय मुलाचे अपहरण करण्यात आल्याच्या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. वाकणपाडा परिसरात राहणारा अल्पवयीन मुलगा गुरुवारी संध्याकाळी सातच्या सुमारास मित्रांसोबत खेळून घरी परत येत होता, मात्र त्यानंतर तो घरी परतला नाही. त्याचे रस्त्यातून आरोपीने अपहरण केले असल्याचा संशय आल्याने मुलाच्या वडिलांनी शनिवारी पेल्हार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे

Hello Vasai
Page No. 1 Jan 09, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# वेश्या व्यवसायातून दोन महिलांची सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : नालासोपाऱ्यात वेश्याव्यवसाय सुरू असलेल्या लॉजवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलिसांनी कारवाई करत सात जणांवर गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत दोन महिलांची वेश्याव्यवसायातून सुटका करण्यात आली आहे.

संतोष भुवन येथील स्वागत लॉजमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलिसांना शनिवारी रात्री साडेअकरा वाजता मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी पुरुष दलालांशी संपर्क साधत बोगस गिऱ्हाईक पाठवून स्वागत लॉजवर छापा मारला.

यावेळी दोन महिलांकडून पुरुष दलाल कमिशनवर पुरुष गिऱ्हाईक पाठवून वेश्याव्यवसाय करवून घेत असल्याचे उघडकीस आले. याबाबत यल्लमा कुंचीपोरवे व विशाल पंडित या दलालांसह जगदीश आण्णा, राजू पुजारी, चिराग, शेखर आण्णा व स्वागत लॉज मालकाविरोधात तुळींज पोलिस ठाण्यात रविवारी अनैतिक मानवी प्रतिबंध कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 09, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# धमकी देत महिलेचा विनयभंग

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** येथील ४६ वर्षीय महिलेची बदनामी करण्याची धमकी देत विनयभंग करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. नालासोपारा परिसरात राहणाऱ्या महिलेला ६ नोव्हेंबरला रात्री साडेदहाच्या सुमारास ओळखीच्या आरोपीने रस्त्यात थांबवून आपल्याशी बोलत का नाही, या कारणावरून तिचे पूर्वी मोबाइलमध्ये असलेले रेकॉर्ड केलेले संभाषण नातेवाइकांना पाठवून बदनामी करीन, अशी धमकी दिली. पीडितेने शनिवारी तक्रार दाखल केली.

Mumbai Main
Page No. 5 Jan 09, 2023
Powered by: erelego.com

लोकमत






# वर्षभरात १,४५,१२७ वाहनचालकांवर कारवाई

## ३ कोटी १९ लाख १७ हजारांचा दंड वसूल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : वसई आणि विरार वाहतूक पोलिसांनी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या बारा महिन्यांच्या कालावधीत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १ लाख ४५ हजार १२७ बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करून ३ कोटी १९ लाख १७ हजार रुपयांचा दंड लावण्यात आला आहे. यात वसई विभागाने ७९ टक्के, तर विरार विभागाने ४४ टक्के दंडांची वसुली देखील केली आहे.

वसई तालुक्यात विरार आणि वसई असे दोन वाहतूक विभाग आहेत. २०२२ मध्ये अवैध प्रवासी वाहतूक, विनापरवाना वाहन चालवणे, सीट बेल्ट न लावणे, सिग्नल तोडणे, मद्यप्राशन करून वाहन चालवणे, नंबर प्लेट न लावणे किंवा चुकीच्या नंबर प्लेट लावणे, चुकीच्या ठिकाणी पार्किंग करणे अशा अनेक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. विरार विभागाने ८२ हजार, तर वसई विभागाने ६२ हजार ८४४ वाहनांवर कारवाई केली. वसई आणि विरार विभागाने मिळून ३ कोटी १९ लाख ७७ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. वसईतून २ कोटी ४३ लाख ७७ हजार, तर विरार विभागातून १ कोटी ५६ लाख १०० रुपयांच्या दंडाची वसुली करण्यात आली आहे.

### वसई, विरार वाहतूक पोलिसांनी केलेल्या कारवाई

| | केसेस |
|---|---|
| विना हेल्मेट : | ५८१ |
| सीटबेल्ट न लावणे : | ११,००० |
| विनापरवाना : | १,०४१ |
| सिग्नल : | २,८१० |
| नंबर प्लेट : | १,५६५ |
| मद्य प्राशन करून वाहन चालवणे : | ११४ |

बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्याबरोबरच दंडाच्या वसुलीचे मोठे आव्हान आमच्यापुढे होते. २०२२ या वर्षात आम्ही दंड वसुलीवर भर दिला होता.

- **सागर इंगोले**, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वसई वाहतूक विभाग

वर्षभर मोहिमा राबवून जनजागृती करत असतो. याशिवाय कारवाईसाठी नाकाबंदी तसेच विशेष मोहीम आखत असतो. त्यामुळे बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई वाढली आहे.

- **दादाराम कारंडे**, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, विरार

लोकमत

# बालकाच्या मृत्यूनंतर रास्ता रोको!

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : १० ते १२ दिवसांपूर्वी सुरू झालेल्या नालासोपारा-विरार लिंक रोडवर बुधवारी रात्री झालेल्या अपघातात एका ८ वर्षीय निष्पाप बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती. याप्रकरणी आरोपी वाहनचालकाला अटक केली नाही व हा रस्ता बंद न केल्याने मुलाच्या घरातील सदस्यांसह स्थानिकांनी रविवारी सकाळी हा रस्ता बंद करून रास्ता रोको केले.



नालासोपारा-विरार लिंक रोडवर रविवारी रास्ता रोको करण्यात आला.

नालासोपारा पोलिसांना याबाबत माहिती मिळाल्यावर घटनास्थळी जाऊन संतप्त लोकांची समजूत काढून रस्त्यावरील दगड, गाड्या बाजूला केल्या. दरम्यान, मनपा हा रस्ता सुविधांसाठी बंद करणार असल्याचे पोलिसांनी 'लोकमत'ला सांगितले. बुधवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास वडील विक्रम भारती आणि ८ वर्षीय मुलगा कपिल हे या मार्गावर उभे असताना भरधाव वेगाने आलेल्या एका बुलेटस्वाराने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कपिलला धडक दिली. त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. पण दुर्दैवाने शुक्रवारी दुपारी बाराच्या सुमारास उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. नालासोपारा पोलिसांनी आरोपीची दुचाकी जप्त करून गुन्हा दाखल केला होता, पण आरोपीला अटक न केल्याने रास्ता रोको करणार असल्याचे घरच्यांनी पोलिसांना पत्र दिले होते. रविवारी स्थानिक नागरिकांनी या रस्त्यावर दुभाजक, स्पीड ब्रेकर आणि पथदिवे नसल्यामुळे अंधाराचा फायदा घेत काही तरुण अद्यापही भरधाव वेगाने ये-जा करतात. त्यामुळे रस्त्यावर दुभाजक, स्पीडब्रेकर आणि पथदिवे लावेपर्यंत हा रस्ता मनपाने बंद करावा यासाठी रास्ता रोको रविवारी सकाळी करण्यात आला.

Hello Vasai
Page No. 1 Jan 09, 2023
Powered by: erelego.com

हर खबर पर नजर है गहरी, हम है आज के प्रहरी, सच्ची खबर आपतक

RNI No.: DELHIN/2021/81851

राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय खबरें

दैनिक राष्ट्रीय हिन्दी समाचार पत्र, नई दिल्ली से प्रकाशित

# आज का प्रहरी

संपादक : संतोष दूबे

LIC

भारतीय जीवन बीमा निगम

LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA



भाजपा के पूर्व अध्यक्ष जल योद्धा अशोक जैतू ने सरोवर सफाई में "जड़ अभियान का छक्का" 2



उ विभाग प्रमुख बनाये गये धिनोद साहनी 4



नॉएडा के एलिवेटेड रोड पर तीन SUV टकराई । गनीमत से बची जान । 8

वर्ष -3 अंक - 08 | दिल्ली, सोमवार 08 जनवरी 2023 | पृष्ठ : 8 मूल्य : 5 रुपए

# पुन: धैर्य योजना' की, समीक्षा करेंगे पुलिस आयुक्त

# हर शनिवार को होगी समीक्षा

■ आज का प्रहरी




प्रेम चौबे / वसई ; महिलाओं द्वारा प्राप्त शिकायतों पर गहन और उचित कार्रवाई करने के उद्देश्य से मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत पुलिस थानों में 'पुन: धैर्य योजना' लागू की जाएगी। थाने में महिलाओं की शिकायत प्राप्त होने के बाद शिकायतकर्ताओ को जांच के अनुसार थाने बुलाया जाता है और कानूनी कार्रवाई की जाती है, कुछ मामलों में महिला शिकायतकर्ता के बीच सुलह या समझौता करके मामला सुलझा लिया जाता है। पर कुछ मामलों में उक्त शिकायतों के निस्तारण के कुछ दिन बाद शिकायतकर्ता महिलाओं को गैर-आवेदकों द्वारा फिर से प्रताड़ित किए जाने की संभावना बनी रहती हैं, अत: पुलिस आयुक्त के आदेशानुसार ऐसी घटनाओं को रोकने तथा आयुक्तालय में पिछले एक वर्ष से पुलिस थाने में प्राप्त शिकायतों के आधार पर महिलाओं को थाने बुलाकर 'पुन: धैर्य ( साहस ) योजना' लागू की जायेगी,उनसे संपर्क कर उनसे पूछ जाऐगा कि वर्तमान में गैर-आवेदकों से किसी प्रकार के उत्पीड़न या अन्य शिकायतों का सामना कर रहे हैं?? यदि हाँ तो उन पर कानूनी कार्रवाई की जाएगी। उक्त कार्यक्रम हर शनिवार के दिन लागू की जाएगी और शिकायतों का निस्तारण महिला पुलिस अधिकारियों/कर्मचारियों के माध्यम से किया जाएगा ।विभागीय सहायक पुलिस आयुक्त के पर्यवेक्षण एवं क्षेत्रीय पुलिस उपायुक्त के मार्गदर्शन में योजना का क्रियान्वयन किया जायेगा तथा पुलिस आयुक्त योजना की समीक्षा करेंगे।

CMYK

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

MHT

मुंबई हिंदमाता टाइम्स

मुंबई, सोमवार 09 जनवरी 2023

RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com

आज का पंचाग: संवत् 2079, पौष शुक्ल पक्ष अष्टमी | सूर्योदय / सूर्यास्त: 07.13 am, 06.17 pm | आज का मौसम | तापमान: अधिकतम 32°C, न्यूनतम 18°C | शेयर बाजार: NSE, BSE | सराफा बजार: Rs. 57,610.00 Per 10 gm, Rs. 71,800 Per Kg

माथेरान बना सबसे पसंदीदा हॉलीडे डेस्टिनेशन ...पेज-3

उर्वशी रौतेला का बिगड़ा फैशन स्टाइल ...पेज-6

# लोकल गुंडों के खिलाफ आयुक्त से शिकायत

**वसई।** वसई, विरार, नायगांव और मीरा-भायंदर में शूटिंग के दौरान टेक्नीशियनों और प्रोडक्शन टीम को कुछ लोकल गुंडे परेशान कर रहे हैं। ये लोकल गुंडे साफ-साफ कहते हैं कि पूरी यूनिट का खाना और शूटिंग के दौरान इस्तेमाल होने वाली क्रेन तथा अन्य उपकरणों और गाड़ी के अलावा जूनियर आर्टिस्ट आदि की सप्लाई हम करेंगे और अगर हमारी बात नहीं मानी तो हम शूटिंग नहीं होने देंगे। जिसकी शिकायत फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉइज (एफडब्लूआइसीई) के प्रेसिडेंट बी .एन. तिवारी, जनरल सेक्रेटरी अशोक दुबे और ट्रेजरार गंगेश्वरलाल श्रीवास्तव ने मीरा-भायंदर तथा वसई-विरार के पुलिस आयुक्त और उपायुक्त को एक शिकायती पत्र लिखकर दी है।

FWICE
Estd. in 1956

दैनिक
मुंबई, नवीमुंबई, ठाणे, पालघर, भिवंडी व कल्याण से एक साथ प्रसारित
प्रभाव समाचार
संपादकः विशाल सिंह
www.prabhavsamachar.com
● वर्ष : ०८ ● अंक : १०८ ● ठाणे, सोमवार 09 जनवरी 2023 RNI No.: MAHHIN/2015/65000 ● पृष्ठ: ८ ● मूल्य २ रु.

# पुलिस कमिश्नर द्वारा बेहतर पहल, शुरू होगी 'धैर्य योजना'

**अजहर शेख : संवाददाता**

**वसई :** महिलाओं द्वारा प्राप्त शिकायतों पर गहन और उचित कार्रवाई करने के उद्देश्य से मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस थानों में 'पुनः धैर्य योजना' लागू की जाएगी। थाने में महिलाओं की शिकायत प्राप्त होने के बाद शिकायतकर्ता और अनावेदक को जांच के अनुसार थाने बुलाया जाता है और कानूनी कार्रवाई की जाती है या कुछ मामलों में महिला शिकायतकर्ता के बीच सुलह या समझौता करके मामला सुलझा लिया जाता है, हालांकि, कुछ मामलों में उक्त शिकायतों के निस्तारण के कुछ दिन बाद शिकायतकर्ता महिलाओं को गैर-आवेदकों द्वारा फिर से प्रताड़ित किए जाने की संभावना है अतः पुलिस आयुक्त के आदेशानुसार ऐसी घटनाओं को रोकने तथा आयुक्तालय में पिछले एक वर्ष से पुलिस थाने में प्राप्त शिकायतों को रोकने के लिए महिलाओं को थाने बुलाकर 'पुनः धैर्य (साहस) योजना' लागू की जायेगी। या उनसे संपर्क करना और उनसे पूछना कि क्या वे वर्तमान में गैर-आवेदकों से किसी प्रकार के उत्पीड़न या उत्पीड़न



का सामना कर रहे हैं। कानूनी कार्रवाई की जाएगी। उक्त गतिविधि प्रत्येक शनिवार को लागू की जाएगी और शिकायतों का निस्तारण महिला पुलिस अधिकारियों/कर्मचारियों के माध्यम से किया जाएगा। विभागीय सहायक पुलिस आयुक्त के पर्यवेक्षण एवं क्षेत्रीय पुलिस उपायुक्त के मार्गदर्शन में योजना का क्रियान्वयन किया जायेगा तथा पुलिस आयुक्त योजना की समीक्षा करेंगे।

दैनिक समाचार पत्र | लखनऊ, कानपुर, उन्नाव, झाँसी, मथुरा व प्रयागराज से प्रसारित | RNI NO - UPHIN2007/22822

खबर सिर्फ जनहित के लिए

पब्लिक पॉवर

सूर्या न्यूज़ 24

आपकी बुलन्द आवाज़

लखनऊ,सोमवार,09,जनवरी,2023, वर्ष 06, अंक :109 पृष्ठ :08, मूल्य 2रू/-

# एमवीवी पुलिस आयुक्तालय द्वारा पुनः धैर्य योजना लागू की, समीक्षा करेंगे पुलिस कमिश्नर

मुंबई पवन पंडित

वसई ; महिलाओं द्वारा प्राप्त शिकायतों पर गहन और उचित कार्रवाई करने के उद्देश्य से मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस थानों में श्पुनः धैर्य योजनाश लागू की जाएगी।

थाने में महिलाओं की शिकायत प्राप्त होने के बाद शिकायतकर्ता और अनावेदक को जांच के अनुसार थाने बुलाया जाता है और कानूनी कार्रवाई की जाती है या कुछ मामलों में महिला शिकायतकर्ता के बीच सुलह या समझौता करके मामला सुलझा लिया जाता है, हालांकि, कुछ मामलों में उक्त शिकायतों के निस्तारण के कुछ दिन बाद शिकायतकर्ता महिलाओं को गैर-आवेदकों द्वारा फिर से प्रताड़ित किए जाने की संभावना है अतरू पुलिस आयुक्त के आदेशानुसार ऐसी घटनाओं को रोकने तथा आयुक्तालय में पिछले



एक वर्ष से पुलिस थाने में प्राप्त शिकायतों को रोकने के लिए महिलाओं को थाने बुलाकर श्पुनः धैर्य ( साहस ) योजनाश लागू की जायेगी। या उनसे संपर्क करना और उनसे पूछना कि क्या वे वर्तमान में गैर-आवेदकों से किसी प्रकार के उत्पीड़न या उत्पीड़न का सामना कर रहे हैं। कानूनी कार्रवाई की जाएगी।उक्त गतिविधि प्रत्येक शनिवार को लागू की जाएगी और शिकायतों का निस्तारण महिला पुलिस अधिकारियों/कर्मचारियों के माध्यम से किया जाएगा।विभागीय सहायक पुलिस आयुक्त के पर्यवेक्षण एवं क्षेत्रीय पुलिस उपायुक्त के मार्गदर्शन में योजना का क्रियान्वयन किया जायेगा तथा पुलिस आयुक्त योजना की समीक्षा करेंगे।

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्षः 26 अंक-206 मुंबई, सोमवार ९ जनवरी 2023 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# 'पुनः धैर्य योजना' प्रत्येक शनिवार को लागू की जाएगी

**वसई** : महिलाओं द्वारा प्राप्त शिकायतों पर गहन और उचित कार्रवाई करने के उद्देश्य से मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस थानों में 'पुनः धैर्य योजना' लागू की जाएगी।थाने में महिलाओं की शिकायत प्राप्त होने के बाद शिकायतकर्ता और अनावेदक को जांच के अनुसार थाने बुलाया जाता है और कानूनी कार्रवाई की जाती है या कुछ मामलों में महिला शिकायतकर्ता के बीच सुलह या समझौता करके मामला सुलझा लिया जाता है, हालांकि, कुछ मामलों में उक्त शिकायतों के निस्तारण के कुछ दिन बाद शिकायतकर्ता महिलाओं को गैर-आवेदकों द्वारा फिर से प्रताड़ित किए जाने की संभावना है अतः पुलिस आयुक्त के आदेशानुसार ऐसी घटनाओं को रोकने तथा आयुक्तालय में पिछले एक वर्ष से पुलिस थाने में प्राप्त शिकायतों को रोकने के लिए महिलाओं को थाने बुलाकर 'पुनः धैर्य ( साहस ) योजना' लागू की जायेगी।




सहायक पुलिस आयुक्त के पर्यवेक्षण एवं क्षेत्रीय पुलिस उपायुक्त के मार्गदर्शन में योजना का क्रियान्वयन किया जायेगा तथा पुलिस आयुक्त योजना की समीक्षा करेंगे।

संस्करण मुंबई, पुणे, जबलपुर, ग्वालियर, नई दिल्ली, इंदौर, भोपाल, सागर, उज्जैन, रतलाम, रायपुर, बिलासपुर, दुर्ग, जयपुर,लखनऊ, जालंधर, रांची, कोलकाता से एक साथ प्रकाशित
मूल्य ₹ 5.00
मुंबई, सोमवार, 9 जनवरी 2023
दैनिक दबंग दुनिया
निष्पक्ष नजर, निष्पक्ष ख़बर

# महिलाओं की शिकायतों के निवारण के लिए 'पुनः धैर्य योजना'' लागू की जाएगी

**वसई।** महिलाओं द्वारा प्राप्त शिकायतों पर गहन और उचित कार्रवाई करने के उद्देश्य से मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस थानों में 'पुनः धैर्य योजना' लागू की जाएगी। थाने में महिलाओं की शिकायत प्राप्त होने के बाद शिकायतकर्ता और अनावेदक को जांच के अनुसार थाने बुलाया जाता है और कानूनी कार्रवाई की जाती है या कुछ मामलों में महिला शिकायतकर्ता के बीच सुलह या समझौता करके मामला सुलझा लिया जाता है, हालांकि, कुछ मामलों में उक्त शिकायतों के निस्तारण के कुछ दिन बाद शिकायतकर्ता महिलाओं को गैर-आवेदकों द्वारा फिर से प्रताड़ित किए जाने की संभावना है अतः पुलिस आयुक्त के आदेशानुसार ऐसी घटनाओं को रोकने तथा आयुक्तालय में पिछले एक वर्ष से पुलिस थाने में प्राप्त शिकायतों को रोकने के लिए महिलाओं को थाने बुलाकर 'पुनः धैर्य ( साहस ) योजना' लागू की जायेगी। या उनसे संपर्क करना और उनसे पूछना कि क्या वे वर्तमान में गैर-आवेदकों से किसी प्रकार के उत्पीड़न या उत्पीड़न का सामना कर रहे हैं। कानूनी कार्रवाई की जाएगी।उक्त गतिविधि प्रत्येक शनिवार को लागू की जाएगी और शिकायतों का निस्तारण महिला पुलिस अधिकारियों/कर्मचारियों के माध्यम से किया जाएगा। विभागीय सहायक पुलिस आयुक्त के पर्यवेक्षण एवं क्षेत्रीय पुलिस उपायुक्त के मार्गदर्शन में योजना का क्रियान्वयन किया जायेगा तथा पुलिस आयुक्त योजना की समीक्षा करेंगे।